# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION/ 64 /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, यांचे कार्यालय,तीन हात
नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–10092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

**—:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:—**

डोंबिवली (पुर्व) शहरातील गणेश मुर्तीचे, चोळेगांव येथील तलावात तसेच डोंबिवली (पश्चिम) येथील मोठागांव रेतीबंदर येथे मोठया प्रमाणात विसर्जन करण्यात येते. गणेश मुर्तीचे विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. १४/०९/२०१८, दि. १७/०९/२०१८, दि. १९/०९/२०१८ दि. २३/०९/२०१८ रोजी विसर्जनाचे मार्गावर व विसर्जन घाट येथील वाहतूक सुनिश्चित रहावी याकरिता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, ठाणे शहर पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

१) डोंबिवली (पुर्व) शहरातील चोळेगांव येथील गणेश मुर्तीचे विसर्जन घाट व परिसरातील खालील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणास व पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

अ) कल्याण –मानपाडा रोडने चोळेगांव विसर्जन तलावाचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदीश हॉटेल येथील नाक्यावर प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने ही ९० फुटी रोडने तसेच घरडा सर्कल वरून उजवीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

ब) चोळेगांव विसर्जन तलाव ते बंदीश हॉटेल दरम्यान सदर रोडच्या दोन्ही बाजूस (गणेश मुर्ती विसर्जनाचे येणाऱ्या वाहना खेरीज) इतर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी नो पार्किंग झोन करण्यात येत आहे.

२) डोंबिवली (पश्चिम) शहरातील मोठागांव रेतीबंदर येथील गणेश मुर्तीचे विसर्जन घाट व परिसरातील खालील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना खालील नमुद ठिकाणी पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

अ) रेतीबंदर चौक–सम्राट चौक–दिनदयाळ चौक, रेतीबंदर चौक ते सत्यवान चौक व रेतीबंदर चौक ते फुले चौक या दरम्यान रोडच्या दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांसाठी नो पार्किंग झोन करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसुचना ही गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. १४/०९/२०१८, दि. १७/०९/२०१८, दि. १९/०९/२०१८ दि. २३/०९/२०१८ रोजी सकाळी ०९.०० ते २४.०० वा. पावेतो अमलात राहिल. सदरची अधिसचुना पोलीस ,अग्निशमन दल, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु रहाणार नाही.

( अमित का. काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा.आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालीका, कल्याण.
मा.जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण.
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण /परिवहन व्यवस्थापक,परिवहन उपक्रम कल्याण–डोंबिवली महानगरपालिका,कल्याण व नवी मुंबई
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३,कल्याण व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ कल्याण वाहतूक विभाग. /पोनि डोंबिवली वा.उपविभाग
२/– म.न.पा.कल्याण च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.